**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २३५ । सोमवार १५ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## बांधकाम सुरू असलेल्या इमारतीतून वायर चोरणारे दोघे सराईत जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बांधकाम सुरू असलेल्या इमारतींमधून इलेक्ट्रिक वायर चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना तोफखाना पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे अटक केली आहे. त्यांच्याकडून १० हजार रुपये किमतीची चोरीची इलेक्ट्रिक वायर जप्त करण्यात आली आहे.


करण मनोज पवार (वय ३१, रा. संजय नगर, कोपरगाव) आणि ऋत्विक सुनील पवार (वय २०, रा. सोनई) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुरुवातीला आरोपींनी पोलिसांना माहिती देण्यास टाळाटाळ केली, मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या पथकातील उपनिरीक्षक योगेश चाहेर, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर आणि सहकाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई केली. या गुन्ह्याचा पुढील तपास महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल संजीवनी नेटके करत आहेत.

## एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांना दंड

### पोलिसांकडून रस्त्यावर नाकाबंदी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



(छाया : राजेंद्र येंडे)

**अहिल्यानगर–** नवीन नियमांनुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट्स () बसवणे अनिवार्य आहे. जर तुमच्याकडे जुने वाहन असेल, तर आरटीओच्या () अधिकृत पोर्टलवरून नवीन नंबर प्लेट बुक करून ती बसवून घेणे आवश्यक आहे, अन्यथा तुम्हाला मोटार वाहन कायद्यानुसार दंड होऊ शकतो. आपल्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी प्रशासनाने अनेक वेळा मुदतवाढ दिली होती. असे असतानाही वाहनधारकांकडून आपल्या जुन्या वाहनाची नंबर प्लेट बदलण्यासाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. अहिल्यानगर शहर आणि उपनगरात अनेक वाहने हाय सिक्युरिटी नंबर नसलेली आहेत. अशा वाहनांची पोलीस प्रशासनाकडून शोध मोहीम सुरू करण्यात ■ पान ४ वर

## शाळेच्या पहिल्या दिवशी फुलांचा वर्षाव, तुतारीचा निनाद अन् कार्टूनसह विद्यार्थ्यांची धमाल

### विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत; आकाशात फुगे सोडून जल्लोष



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त सोमवारी (दि. १५ जून) कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांचे अत्यंत उत्साहपूर्ण आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. फुलांच्या वर्षावात, तुतारीच्या मंगल निनादात आणि विद्यार्थ्यांच्या आवडत्या कार्टून पात्रांच्या उपस्थितीत शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी आनंद, उत्साह आणि जल्लोषाचा अनोखा अनुभव घेतला.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळेच्या परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. शाळेच्या प्रवेशद्वारापासूनच विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी विशेष तयारी करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे खास आकर्षण ठरलेल्या कार्टून पात्रांनी प्रवेशद्वारावर उभे राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आपल्या आवडत्या कार्टूनसोबत हस्तांदोलन करताना आणि छायाचित्रे काढताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे आगमन होताच त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तुतारीच्या गजराने आणि टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आल्याने संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून गेला. अनेक दिवसांच्या सुट्टीनंतर मित्र-मैत्रिणींना भेटल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होता.

या स्वागत समारंभासाठी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, अनिलराव साळुंके, स्कूल कमिटी सदस्य अंबादास गारुडकर, ॲड. रविंद्र शितोळे, श्यामराव व्यवहारे, माजी नगरसेवक संजय घुले, विष्णूपंत म्हस्के, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख मिनाक्षी खोडदे, स्वाती गारुडकर आदींसह पालक प्रतिनिधी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडण्यात आले. या उपक्रमामुळे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाचा संदेश उत्साहपूर्ण वातावरणात देण्यात आला.

प्रास्ताविक करताना माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे यांनी शाळेत दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि शैक्षणिक गुणवत्ता सातत्याने वाढावी यासाठी शाळा विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शाळेच्या गुणवत्तेचा सातत्याने वाढणारा आलेखही त्यांनी यावेळी उपस्थितांसमोर मांडला. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

## दिल्लीगेट येथे रस्ता दुभाजकामुळे भीषण अपघात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक दिल्ली गेट वेशी जवळ दोन वाहनांचा भीषण अपघात झाला. दिल्लीगेट ते नेप्ती नाका रस्त्यावर काही महिन्यांपूर्वीच ठेकेदाराच्या माध्यमातून रस्ता दुभाजक उभारण्यात आले होते. या रस्ता दुभाजकामुळे भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये एका ट्रक सह कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

रविवारी संध्याकाळी दहा वाजण्याच्या ■ पान ४ वर

दिल्ली दरवाजा ते नेप्ती चौक पर्यंत आमदार संग्राम भैया जगताप यांच्या माध्यमातून अत्यंत उत्कृष्ट दर्जाचा सिमेंट काँक्रेट रस्ता करण्यात आलेला आहे. मात्र त्यावेळी या रस्त्यावर दुभाजक टाकण्याचे कोणतेही नियोजन नव्हते. रस्ता झाल्यानंतर अनेक महिन्यांनी ठेकेदाराच्या माध्यमातून या रस्त्यावर दुभाजक टाकण्याचा घाट घालण्यात आला. त्यासाठी या रस्त्यावर ठिकठिकाणी ड्रिल मशीनच्या सहाय्याने होल मारून त्यात साधे गज उभे करून, त्याच गजाच्या सहाय्याने रस्ता दुभाजक उभे करण्यात आले होते. रस्त्यावर मध्यभागी दुभाजक जरी उभे करण्यात आले असले तरी त्यावर वाहतूक नियमानुसार कोणत्याही प्रकारची रंगरंगोटी अथवा रेडियम तथा रिफ्लेक्टर बसवण्यात आले नव्हते. किंवा या रस्त्यावर दुभाजक आहेत असा कुठलाही फलक लावण्यात आलेला नव्हता. या प्रकारामुळे रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांना दुभाजक दिसून येत नव्हता. रस्ता दुभाजक उभे केल्यापासून आजपर्यंत कमीत कमी दहा ते पंधरा वाहनांना याच ठिकाणी अपघाताला सामोरे जावे लागले आहे. आता उर्वरित दुभाजक सुद्धा महानगरपालिकेने त्वरित काढून टाकावा अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

## मोहरम मिरवणुकांमध्ये डीजेला बंदी

### नियम मोडल्यास कारवाई – डीवायएसपी डॉ. दिलीप टिपरसे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** १७ जूनपासून सुरू होणाऱ्या मोहरम उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर शहर पोलिसांनी तयारीला वेग दिला आहे. मोहरम मिरवणुकांमध्ये डीजे वाजविण्यास सक्त मनाई करण्यात आली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून डीजे जप्त करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिला.

मोहरम उत्सवाच्या अनुषंगाने छोटे बारा इमाम कोठला परिसरात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, भिंगार कॅम्पच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, गोपनीय शाखेचे कर्मचारी, विविध यंग पार्टीचे पदाधिकारी, सरबत गाडी चालक, टेंभा व सवारी मिरवणूक मंडळांचे प्रमुख तसेच जबाबदार नागरिक उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मोहरम उत्सव आयोजकांनी मिरवणूक मार्गावरील खड्डे तातडीने बुजविणे, पुरेशी वीज व्यवस्था उपलब्ध करून देणे, महिला बंदोबस्त वाढविणे तसेच सोशल मीडियावर धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट, व्हिडिओवर ■ पान ४ वर

## बीड-मुंबई लाँग मार्चप्रश्नी सरकारने मध्यस्थी करावी; आज अहिल्यानगरात स्वागताचे आवाहन – सुरेश बनसोडे

### अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी आंबेडकरी समाजाची मंत्री संजय शिरसाट यांच्याशी चर्चा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई असा निघालेल्या लाँग मार्चच्या पार्श्वभूमीवर समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने राज्याचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाठ यांची शासकीय विश्रामगृह येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी लाँग मार्च स्वागत समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक सुरेश बनसोडे, ज्येष्ठ आंबेडकरी नेते अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, निवृत्ती आरु, अमित काळे, प्रा. जयंत गायकवाड, एन एम पवळे, विशाल गायकवाड प्रा भिमराव पगारे , सिद्धार्थ राजगुरु यांच्यासह आंबेडकरी समाजातील कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुरेश बनसोडे यांनी सांगितले की, बीड ते मुंबई निघालेल्या लाँग मार्चबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे करण्यात आली. तसेच या आंदोलनाबाबत शासनाने मध्यस्थी करून आंदोलनकर्ते व शासन यांच्यात सकारात्मक संवाद घडवून आणावा, अशीही मागणी करण्यात आली.

यावर मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, २०२६ ची जनगणना पूर्ण होईपर्यंत अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्यात आली असून, याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट आहे. तसेच आंदोलनाच्या आयोजकांशी चर्चा करून पुढील दिशा ठरविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुढे बोलताना सुरेश बनसोडे म्हणाले की, उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यभरातून एक लाखांहून अधिक हरकती प्राप्त झालेल्या आहेत. ■ पान ४ वर

## गुरुजनांनी अनेक पिढ्या समृद्ध केल्या – ना. राधाकृष्ण विखे पाटील

### शहरात झालेल्या संकल्प मेळाव्यात पेन्शनरांचे प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अनेक पिढ्या घडविण्याचे काम गुरुजनांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाने विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवला. त्यांच्यामुळे समाजव्यवस्था टिकून आहे. आज व्यवस्था बदललेली, काळ बदलले मात्र आजही जुन्या काळातील गुरुजींचा दरारा तेवढाच आहे. गुरुजी या नावाने समाजात वेगळे स्थान मिळवले आहे. चिरंतर काम करुन त्यांनी अनेक पिढ्या समृद्ध केले. मी बोलतो ते देखील गुरुजींची देणगी असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री तथा जलसंधारण मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

सेवानिवृत्त कर्मचारी व पेन्शनरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनच्या वतीने शहरात नंदनवन लॉन येथे 'संकल्प मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याप्रसंगी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते. हा मेळावा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी आमदार काशिनाथ दाते, आमदार विठ्ठलराव लंघे, उपमहापौर धनंजय जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, विभागीय अध्यक्ष वसंतराव सबनीस, धुळे अध्यक्ष अनंतराव पाटील, जळगाव अध्यक्ष सदाभाऊ सोनवणे, नंदुरबार अध्यक्ष मधुकर साबळे, नाशिक अध्यक्ष बाळासाहेब खैरनार, अहिल्यानगरचे अध्यक्ष द.मा. ठुबे गुरुजी, कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, सरचिटणीस बन्सी उबाळे आदींसह लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच जिल्हाभरातील हजारो पेन्शनर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पुढे बोलताना पालकमंत्री विखे म्हणाले की, सोमवारी किंवा मंगळवारी पेन्शनर्सची बैठक घेऊन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रश्न सोडविण्याचे सूचना त्यांना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वीसारखी शिक्षण व्यवस्था नाही, पूर्वी ज्ञानमंदिरे होती. सध्या समाजात वाढत चाललेला जातीयवाद चिंताजनक असल्याचे त्यांनी भाष्य केले. तरुण पिढीला घडविण्याचे पुण्याचे काम गुरुजनांनी केले. पुन्हा सुसंस्कृत व आत्मनिर्भर पिढी घडविण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

प्रा. राम शिंदे म्हणाले की, शेवटच्या घटकाची जबाबदारी घेऊन शिक्षक कार्य करतो. ज्यांना घडवले ते आमदार झाले, त्यांनी प्रश्न मांडले तर प्रश्न सुटतील. विधान परिषदेत पेन्शनरांचा प्रश्न सुटेपर्यंत प्रश्न लावून धरण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

गुरुजींनी अनेक पिढ्या घडवून राज्य प्रगतीवर नेला. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत नेल्या. माणसं घडविण्याचे काम त्यांनी केले. तुमच्या प्रश्नाकडे कोणीही दुर्लक्ष करू शकत नाही. पेन्शन ही मेहरबानी नसून, तुमच्या घामाचा व हक्काचा पैसा आहे. हा प्रश्न सोडविणे ही आमची नैतिक जबाबदारी असून, संपूर्ण राज्यातील हा प्रश्न निकालात काढू. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक घेऊन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले. ६५ वर्षानंतर पेन्शन वाढ मिळाली पाहिजे, ही रास्त मागणी पुढे घेऊन जाऊ. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### महानगरपालिकेची राज्यात मानाची झेप; जनगणना कार्यात राज्यात दुसरा क्रमांक



अहिल्यानगर - राज्यातील जनगणना व संबंधित प्रशासकीय कामकाजामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात दुसरा क्रमांक प्राप्त केल्याबद्दल उपआयुक्त यशवंत लहारे यांचा माजी नगरसेविका कलावती शेळके व शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना पदाधिकारी काका शेळके, कृष्णा टपळे, रोहन मोटे, संग्राम शेळके यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. महानगरपालिकेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. राज्य शासनाने दिलेल्या जनगणना व नागरिक माहिती संकलनाशी संबंधित विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडत अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. या यशामध्ये आयुक्त डांगे आणि उपआयुक्त यशवंत लहारे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले. उपआयुक्त लहारे यांनी विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सातत्याने पाठपुरावा करून घेत जनगणना कामकाज वेळेत व अचूक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. सत्कार प्रसंगी बोलताना शिवसेना पदाधिकारी काका शेळके म्हणाले, अहिल्यानगर महानगरपालिकेला जनगणना कार्यामध्ये राज्यात दुसरा क्रमांक मिळणे ही संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. यामागे प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची मेहनत आहे. विशेषतः उपआयुक्त यशवंत लहारे यांनी प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष ठेवून कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यामुळे हे यश प्राप्त होऊ शकले. पुढे बोलताना काका शेळके म्हणाले, आयुक्त डांगे आणि उपआयुक्त लहारे यांनी जनगणना कार्य केवळ एक शासकीय जबाबदारी म्हणून न पाहता नागरिकांच्या विकासाशी निगडित महत्त्वाचे काम म्हणून हाताळले. प्रशासनातील समन्वय, नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणीमुळे आज अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. भविष्यात हेच यश कायम राखत राज्यात प्रथम क्रमांक मिळवण्याचा संकल्प प्रशासनाने करावा.

### सकारात्मक संज्ञान-क्रांतीसाठी 'पसायदान भक्ती-ज्ञान-कर्म पीठ' स्थापन



अहिल्यानगर - पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने ''पसायदान भक्ती-ज्ञान-कर्म पीठ'' स्थापन करण्याची जनहित घोषणा करण्यात आली आहे. सर्व सजीवांचे कल्याण, निसर्गसंवर्धन, युवकांची सकारात्मक संज्ञान-क्रांती, जनजागृती आणि प्रत्यक्ष कृती यांचा संगम घडवून आणणे, हे या पीठाचे प्रमुख ध्येय आहे. ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या जन्मदिनानिमित्त हा उपक्रम जाहीर करण्यात आल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. ज्ञानेश्वर माऊलींचे 'पसायदान' हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मात्र आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत पसायदानाकडे केवळ भक्तिपर प्रार्थना म्हणून न पाहता, लोककल्याणाचा कृतीशील कार्यक्रम म्हणून पाहण्याची गरज आहे, असे या घोषणेत नमूद करण्यात आले आहे. ''जो जे वांछिल तो ते लाहो'' ही ओळ केवळ वैयक्तिक इच्छा पूर्ण होण्याची अपेक्षा नसून, प्रत्येक सजीवाला अन्न, पाणी, शुद्ध हवा, सन्मान, सुरक्षा आणि समान जीवनसंधी मिळाली पाहिजे, या व्यापक सामाजिक जबाबदारीची घोषणा आहे, असे मत व्यक्त करण्यात आले.या पार्श्वभूमीवर स्थापन होणारे 'पसायदान भक्ती-ज्ञान-कर्म पीठ' हे भक्ती, ज्ञान आणि कर्म यांचा त्रिवेणी संगम घडविणारे लोकचळवळीचे केंद्र म्हणून कार्य करणार आहे.

## सेवानिवृत्तीनंतर पर्यावरण संरक्षण व संवर्धन कार्यात योगदान द्यावे – पद्मश्री डॉ. पोपटराव पवार

### शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ रवींद्र कापरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात काम करणारे रवींद्र कापरे यांचे कार्य दीपस्तंभासारखे असून समाजाने त्यांचा आदर्श घ्यायला हवा, असे प्रतिपादन आमदार अक्षयदादा कर्डिले यांनी केले. कोपरगावचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र कापरे यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

रवींद्र कापरे यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त करताना आमदार अक्षय कर्डिले यांनी त्यांच्या गौरवशाली कार्याचा उल्लेख केला. अभ्यासू, कार्यतत्पर आणि समाजाविषयी संवेदनशीलता जपणारा अधिकारी म्हणून रवींद्र कापरे यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी राहील, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच तसेच आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समिती, महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटराव पवार होते. यावेळी त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. ''रवींद्र कापरे यांनी उर्वरित काळात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन कार्यात मदत करावी. शैक्षणिक क्षेत्रातून सेवानिवृत्त होत असले तरी पर्यावरण संवर्धन आणि समाजकारणामध्ये तुमच्यासह सर्व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवून सक्रिय व्हावे. त्यामुळे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास कमी करण्यामध्ये आपली भूमिका मोलाची ठरेल,'' असे आवाहन पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण सहसंचालक रमाकांत काठमोरे, माजी शिक्षण संचालक दिनकरराव टेमकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) अहिल्यानगरचे दादाभाऊ गुंजाळ, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, माजी शिक्षणाधिकारी अरुण धामणे व रामदास हराळ, सहाय्यक संचालक लोकल फंड अहिल्यानगरचे रमेश कासार, अर्जुन मिसाळ, महादेव काठमोरे, पंचायत समिती अहिल्यानगरच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती तृप्ती कोलते, शिवनाथ निर्मळ, गुलाब सय्यद, डी. डी. वाकचौरे, शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले, संजय कळमकर, बापूसाहेब तांबे यांच्यासह शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक आणि कापरे परिवाराचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरोही संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे तबला परीक्षेत घवघवीत यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या वतीने एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या तबला परीक्षांमध्ये नवनागापूर येथील आरोही संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे यामध्ये विद्यालयाचा विद्यार्थी संस्कार जाधव याने तबला विशारद परीक्षेत प्रथम श्रेणीतून उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे तसेच तुषार कोऱ्हाळे या विद्यार्थ्याने तबला विशारद प्रथम परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे या दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या उल्लेखनीय यशाचे आरोही संगीत विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तबला विशारद प्राध्यापक स्वप्निल खराडे यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## रक्तदान हीच खरी सेवा, रक्तदान हेच श्रेष्ठ दान

### जागतिक रक्तदाता दिनानिमित्त स्नेहबंधच्या रक्तदान जनजागृती पोस्टरचे अनावरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक रक्तदाता दिन (१४ जून) निमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने रक्तदान जनजागृती अभियानांतर्गत विशेष पोस्टरचे अनावरण करण्यात आले. स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रवर अधीक्षक डाकघर अहिल्यानगर मंडल विकास पालवे, अहिल्यानगरचे आमदार संग्रामभैय्या जगताप, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या हस्ते पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ. उद्धव



शिंदे उपस्थित होते.

पोस्टरद्वारे ''रक्तदान करा, जीवन वाचवा'', ''रक्तदान सुरक्षित आहे'', ''नियमित रक्तदानाने आरोग्य चांगले राहते'', ''समाजात एकता व बंधुत्व वाढते'' तसेच ''आपले थोडेसे रक्त... कुणाच्या तरी नव्या जीवनाची सुरुवात'' असा प्रभावी संदेश देण्यात आला.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले की, रक्तदान हे मानवतेची सेवा करणारे सर्वश्रेष्ठ दान आहे. अपघातग्रस्त, गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया तसेच थॅलेसेमिया रुग्णांसाठी रक्ताची सातत्याने आवश्यकता असते. प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडावे. रक्तदानामुळे दुसऱ्याचे प्राण वाचण्यास मदत होते आणि समाजात सेवाभाव व बंधुत्वाची भावना अधिक दृढ होते. रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून युवकांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

## जलसंवर्धनातून समृध्दीकडे नेणारा आधारवड!

प्रथमतः सन्मा.नामदार डॉ.राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील साहेब, मंत्री जलसंपदा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अहिल्यानगर जिल्हा यांस वाढदिवस तथा अभिष्टचिंतन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



**श्री.संतोष देविदास कोकणे**
एम.ए.बी.एड (राज्यशास्त्र)
निळवंडे धरणाचे

सन्मा.नामदार साहेबांनी आपल्या राजकीय, सामाजिक कारकीर्दीत विविध पदे भूषविली व त्या सर्वच पदांचा गोरगरीब, शोषित, वंचीत आदि सर्वच घटकांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने यथायोग्य प्रयत्न केले हे सर्वांना ज्ञात आहेच, राजकारण व समाजकारण यामध्ये सुमध्य साधत पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील व स्वर्गीय पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या विचारांचा वसा व वारसा अविरतपणे पुढे घेऊन जात जनतेशी एक परोकाराचे नाते वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न ते सातत्याने करत आहेत. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत एक विकासाचा उतुंग असा विशाल पर्वत उभा केलेला आहे. सामाजीक जीवनात व राजकारणात भूषविलेल्या सर्वच पदावर काम करताना एक लोकाभिमुख वृत्तीतून नवनवीन आव्हानात्मक निर्णय त्यांनी घेतले व ते यशस्वी देखील केले. त्याचेच एक धोतक म्हणून अलिकडेच मराठा आरक्षणाचा तिढा साहेबांच्या पुढाकारातून यशस्वीरित्या मार्गी लागला ही सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री म्हणून काम करताना जलसंपदा विभागास देशात अव्वल स्थान मिळवून देण्यात साहेबांचे कृतिशिल योगदान राहिले. जलसंपदा विभागाची धुरा सांभाळताना अनेक धोरणात्मक व लोकाभिमुख निर्णयांची अमलबजावनी करत नवनविन जलस्त्रोत निर्माण करून दुरदृष्टीतून महाराष्ट्र दुष्काळमुक्त कसा होवू शकेल यासाठी राज्य व केंद्र सरकारच्या मासध्यमातून विविध योजनांची पायाभरणी याद्वारे करत आहेत.

शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून साहेबांची ख्याती सर्वदूर पोहचली आहे. गेली अनेक दशके बहुचर्चित निळवंडे धरण व कालव्यांचा प्रलंबीत प्रश्नांबाबत साहेबांनी स्वतः पुढाकर घेत वेळोवेळी पाठपुरावा करून अनेक वर्षांपासून रखडलेले कालव्यांचे प्रश्न साहेबांच्या पुढाकाराने मार्गे लागले. वर्षानुवर्ष पाण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या अगदी चातक पक्षाप्रमाणे पण्याची आस लावून बसलेल्या अवघ्या जगाचा पोशिंदा मायबाप शेतकऱ्याला एक सुखद ओलावा या निमित्ताने याची देही याची डोळा पहावयास मिळाला. खरंतर निळवंडे धरणाच्या व कालव्याच्या प्रश्नाबाबत साहेबांनी वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न असेल कालवा ग्रस्तांचे प्रश्न असेल आदि बाबत धोरणात्मक भूमिका घेतली. दुष्काळी भागाला वरदान ठरणाऱ्या निळवंडे धरणाच्या कालव्यांच्या बाबतीत केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या स्तरावर साहेबांनी वेळोवेळी पाठपुरावा करून निधीची उपलब्धता करून दिल्याने सदर विषयी मार्गी लागले.

पाणी हे जीवन आहे त्याचा वापर योग्य व काटकसरीने करणे काळाची गरज आहे. खरतच पाण्याविणा जीवनाची कल्पनाच करणे चुकीचे ठरेल. सन्मा.नामदार साहेब यांचे माध्यमातून मोठया प्रमाणावर शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे कार्य सातत्याने होत असताना दिसत आहे.

शिक्षण, आरोग्य, रोजगार, स्वंयरोजगार, व्यवसाय, शेती, सहकार, सिंचन, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आदि क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल साहेबांना वेळोवेळी गौरविण्यात आलेले आहे. सन्मा.खासदार डॉक्टर सुजय दादा विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे राष्ट्रीय वयोश्री योजनेच्या माध्यमातून साठ वर्षावरील नागरिकांना मोफत सहाय्यक साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात येवून जवळपास ४० ते ४५ हजार लाभार्थ्यांची नोंदणी करून सदर लाभार्थ्यांना मोफत सहायक साधने वाटप करण्यात आली. हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम साहेब व दादा यांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर राबविण्यात आला. याचे प्रत्यक्ष दर्शनी साक्षीदार म्हणून व एक त्याद्वारे सेवा करण्याची संधी या निमित्ताने आम्हाला मिळाली हे आमचे परम भाग्य आहे. सन्माननीय साहेबांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी होत आहे शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवून त्याद्वारे जनतेला न्याय मिळवून देत त्यांच्यामध्ये एक नवी उमेद, व चैतन्य निर्माण करण्याचे कार्य जनसेवा फौंडेशनच्या माध्यमातून सातत्याने व निरंतर सुरू आहे.

राखावे बहुतांचे अंतरे (मन) भाग्य येते तद्नंतरे या उक्तीप्रमाणे साहेबांनी अनेकांचे मने राखत आपल्या सुस्वभावाने एक वेगळी छबी निर्माण केलेली आहे. सतत कार्यमग्नता व नाविन्याचा ध्यास घेणारे सृजनशिल व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली आहे राजकारण व समाजकारण यामध्ये समन्वय साधत सुख व दुःख यात फारकत न करता संघटनेतील कार्यकर्ता असो वा राजकारणा पडलीकडील मैत्री असो यामध्ये सुखद व दुःखद कार्यक्रमात सहज समरस होत आहेत.

थोडक्यात ''मार्ग दाऊनी गेले आधी दयानिधी संत ते तेणेचिं पंथे चालो जाता न पडे गुंता कोठे काही या संत वचनाप्रमाणे थोर महापुरूषांनी अथवा साधुसंतांनी दाखवून दिलेल्या सद् विवेक, सदाचार, सद्भावना या मार्गाचा यथायोग्य अवलंब करत अखंड जनसेवेचा वसा अंगीकारून त्याद्वारे आपल्या कार्यकर्तुत्वातून सामांन्य जनतेचे सेवाव्रत स्विकारले आहे.

निश्चयाचा महामेरू बहुत जनांसी आधारू अखंड स्थितीचा निर्धारु श्रीमंत योगी या उक्तीचा आपल्या एकुण जीवनप्रवासात अंतर्भाव करत येणार प्रत्येक पाऊल विकासात्मक व लोककल्याणासाठी समर्पीत करणा-या लोकनेत्यास अभिष्टचींतन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा ! आपणांस उत्तम आर्युआरोग्य लाभो हीच साई चरणी प्रार्थना !

पुनश्चः साहेबांच्या लोककल्याणकारी अविरत प्रवासास माझ्या मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा !

## जायकवाडी धरणात केवळ २९ टक्के पाणी शिल्लक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** मराठवाड्याची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या जायकवाडी धरण येथील पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाली असून सध्या धरणात केवळ २९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. वाढते तापमान, अपुरा पाऊस आणि पाण्याचा वाढता वापर यामुळे धरणातील जलपातळी सातत्याने खालावत आहे. धरणातील घटत्या पाणीसाठ्यामुळे पिण्याचे पाणी, शेतीसाठी सिंचन तसेच औद्योगिक वापराच्या नियोजनाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आगामी काळात समाधानकारक पाऊस न झाल्यास मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे वतीने 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका' पुरस्काराने सुरेखा घोलप यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य आयोजित प्रथम राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात व्ही के हायस्कूल, पनवेल जि.रायगड येथे पार पडला.या कार्यक्रमात नगर जिल्ह्यातून सुरेखा घोलप-भुकन यांना सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने गौरवण्यात आले.याप्रसंगी स्वागतोत्सुक व मार्गदर्शक अनिल नाचपल्ले, स्वागताध्यक्ष माजी शिक्षक आमदार(कोकण विभाग)बाळाराम पाटील तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

सुरेखा घोलप या सावित्री शक्तीपीठच्या अध्यक्षा असून ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयात मराठी अध्यापनाचे कार्य करीत असून नुकताच १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात घोलप यांचा अंतरी हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. अभिवाचन,वृत्तनिवेदक,सूत्रसंचालिका नाट्य,लेखन-दिग्दर्शन,एकांकिका,शॉर्टफिल्म्स ,काव्यवाचन याशिवाय साहित्यिक,सांस्कृतिक कार्यक्रमात विविध पुरस्कार प्राप्त आहेत.

## राजणी शिवारात मोठा वाळूसाठा जप्त; घरकुल लाभार्थ्यांना वाटपाची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील राजणी शिवारात सरकारी गायरान व खासगी शेतजमिनीत साठवून ठेवलेला मोठा वाळूसाठा महसूल विभागाने जप्त केला. ही कारवाई शनिवारी (दि. १३ जून) पैठण तहसीलदार ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



कारवाईवेळी बिडकीन मंडळ अधिकारी रवींद्र जोशी, ग्राम महसूल अधिकारी सचिन काशीकर, रवींद्र मुखारे, रांजणगाव खुरीचे ग्राम महसूल अधिकारी ज्ञानेश्वर साळुंके, पोलीस पाटील हरिचंद लघाने तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) महाराष्ट्र राज्य युवा सचिव अमोल भैया नरवडे, ताराचंद गणराज, गोविंद बर्फे, नंदू लघाने यांच्यासह अनेक नागरिकांनी घटनास्थळी भेट दिली.

जप्त करण्यात आलेला वाळूसाठा रांजणगाव पंचायत समिती गण व लोहगाव पंचायत समिती गणातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत अथवा नियमानुसार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी उपस्थित नागरिकांनी महसूल प्रशासनाकडे केली आहे. या मागणीमुळे घरकुल बांधकामासाठी वाळूची अडचण भेडसावणाऱ्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### विजय भालसिंग यांना मुंबईत 'राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान' पुरस्काराने गौरव



अहिल्यानगर - समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, धार्मिक उपक्रम आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणारे वाळकी (ता. नगर) येथील सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या वतीने मुंबई येथे आयोजित दर्पण गौरव संमेलनात हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.मुंबईतील पत्रकार भवन येथे झालेल्या या सोहळ्यात प्रसिद्ध कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर यांच्या हस्ते भालसिंग यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आयकर विभागाचे प्रमुख अतिरिक्त आयुक्त सुनिल अगवणे, संगीतकार कौशल इनामदार, डॉ. अमजद खान पठाण, डॉ. पूर्णिमा सुर्वे, जलसंपदा विभागाचे विशेष अधीक्षक डॉ. जे. के. महाडिक, समाजभूषण पुरस्कार विजेते उत्तम तरकसे, सायली पावसकर, कार्यक्रमाच्या संयोजिका सलमा खान, एन. डी. खान यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विजय भालसिंग हे गेल्या जवळपास वीस वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि पर्यावरण क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. एसटी बँकेतील नोकरी सांभाळत असतानाही त्यांनी समाजसेवेची वाट निवडली असून, कोणतेही शासकीय अनुदान किंवा वर्गणी न घेता स्वतःच्या खर्चातून विविध उपक्रम राबविण्याची त्यांची परंपरा कायम आहे. ग्रामीण भागातील प्रश्न, नागरिकांच्या अडचणी आणि पर्यावरण संवर्धनाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी सातत्याने जनजागृती आणि प्रत्यक्ष कृतीवर भर दिला आहे. वाढते शहरीकरण आणि कमी होत चाललेली नैसर्गिक अधिवास व्यवस्था यामुळे पशु-पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याची जाणीव ठेवून भालसिंग यांनी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत तहानलेल्या पशु-पक्ष्यांसाठी विविध ठिकाणी पाणवठे निर्माण करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, झाडांवर धान्य आणि पाण्याची भांडी लावणे, तसेच पक्ष्यांना सुरक्षित निवारा मिळावा यासाठी नारळाच्या सालींपासून कृत्रिम घरटी तयार करून ती विविध परिसरात बसविणे, असे अनेक उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत. पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन या उद्देशाने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन मोहिमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांनी लावलेल्या अनेक वृक्षांचे संगोपन करून हरित क्षेत्र वाढविण्याचे कार्य केले आहे.

### आमदार संग्राम जगताप व उपमहापौर धनंजय जाधव यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

अहिल्यानगर - वृक्षारोपण ही काळाची गरज आहे.कोरोना काळात जेव्हा ऑक्सिजनची कमी जाणवली.तेव्हा पासून मानवाला पर्यावरणाचे महत्त्व लक्षात आले आहे.वाढते तापमान व उष्णता यामुळे मानवाचे जीवन असह्य झाले आहे.वृक्ष तोड करुन मानवाने पर्यावरणाची मोठी हानी केली आहे. उपमहापौर धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी हा प्रोजेक्ट हाती घेतला आहे.नागरिकांनी या प्रकल्पास भरभरून प्रतिसाद दिला आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे.पर्यावरणाचा समतोल राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.प्रत्येकाने एक तरी झाड लावावे असा संकल्प करावा.असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचा लोकशाहीर डॉ. आण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त डॉ.सुनिल सकट यांनी केले आहे. सावेडी जॉगींग पार्क येथे आमदार संग्राम जगताप व उपमहापौर ॲड.धनंजय जाधव यांच्या वाढदिवसा निमीत्त सामाजिक कार्यकर्ते मल्हार गंधे यांच्या हस्ते कलमी आंब्याचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी गौरव परदेशी, हुजेफा शेख,आर्यन चव्हाण, अक्षय मेना आदी उपस्थित होते.हा उपक्रम भाजपा अनु.जा.मोर्चाचे शहरजिल्हा सरचिटणीस डॉ.सुनिल सकट व चिटणीस अशोक भोसले यांच्या पुढाकाराने राबवण्यात आला.

# लेखी गहिवरल्या... जावई भारावले...

## चौंडीचे धोंडे जेवण सभापती प्रा. शिंदे यांना देऊन गेले भरभरून कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**चौंडी (ता. जामखेड) –** आई-वडील, भाऊ व जुन्या मैत्रिणी भेटल्याने लेकी खूष होत्या...यानिमित्ताने सर्वांशी सुख-दुःखाचा संवाद झाल्याने त्या गहिवरल्या तर, आख्या गावाने आपला सन्मान केल्याच्या आनंदाने जावई भारावले...ठिकाण होते- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी व निमित्त होते- अधिक मासानिमित्त विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आयोजित केलेल्या धोंडे जेवण सोहळ्याचे. एखाद्या गावाने गावच्या लेक-जावयांसाठी धोंडे जेवणाचा सोहळा आयोजित करण्याची ही राज्यातील पहिलीच घटना असल्याने तिचे आयोजन करणारे सभापती प्रा. शिंदे राज्यभरातील ७०० वर लेक-जावयांकडून कौतुक मिळवून गेले. आमच्या आयुष्यातील हा अविस्मरणीय सोहळा ठरला असे गौरवोद्गारही व्यक्त करून गेले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती व अधिक मास यानिमित्त सभापती प्रा. शिंदे यांच्या पुढाकाराने चोंडी ग्रामस्थांनी लेक-जावयांचा सन्मान सोहळा आज रविवारी (१४ जून) आयोजित केला होता. कर्जत-जामखेड व अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातून तसेच पुणे, बारामती, करमाळा, मुंबई अशा अनेक ठिकाणाहून सर्व जाती धर्माचे लेक- जावई आले होते. ७०० वर जावई, तेवढ्याच लेकी, त्यांची मुले-मुली व अन्य कुटुंबिय मिळून साडेतीन ते चार हजार जणांचे अनोखे गेट-टुगेदर या निमित्ताने रंगले. या सर्वांसाठी तब्बल १०० किलो पुरण, त्याच्या पोळ्या, पुरणाचा धोंडा, त्यावर साजूक तूप समवेत दूध गुळवणी, कटाची आमटी, भात, भजी, पापड, कुरडई असा जेवणाचा मेनू होता. गावातील महिलांनी यापैकी बहुतांश पुरणपोळ्या लाटल्या.





तृप्तीचा ढेकर देत नंतर सर्वांनी आवर्जून प्रा. शिंदे यांची भेट घेऊन त्यांचे मनापासून कौतुक केले.

**जंगी निघाली मिरवणूक**

या अनोख्या सोहळ्यासाठी आलेल्या जावयांना फेटा बांधून व त्यांच्या कपाळी गंधाक्षता लावून औक्षण करण्यात आले. सभापती प्रा. शिंदे यांच्या पत्नी व जामखेड पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. आशाताई शिंदे यांच्यासह गावातील महिलांनी जावई मंडळींचे स्वागत केले. त्यानंतर त्यांची अहिल्यादेवी यांनी स्थापन केलेल्या अहिल्येश्वर महादेव मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. वैजापूर येथील प्रसिद्ध चौऊश ब्रॉस बँड पथकाने सादर केलेल्या जुन्या-नव्या गाण्यांच्या मेजवानीत व फटाक्यांच्या आतषबाजीत निघालेल्या या मिरवणुकीत लेकीबाळींच्या फुगड्या रंगल्या. ब्रँड पथकाद्वारे लाडाचा जावई आला सासरला, परदेशीया ये सच है पिया, नवरी नटली, राम जी की निकली सवारी, झिंग झिंग झिंगाट अशा गाण्यांसह शिवछत्रपतींचा पोवाडा व महाराष्ट्र गीतांचे सादरीकरण दाद मिळवून गेले. यावेळी काही जावयांनी आपल्या मंडळीला (पत्नी) उचलून घेत नृत्योत्सव रंगवला. महादेव मंदिर परिसरात व पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारक परिसरात सर्वांचे एकत्रित छायाचित्र घेतले गेले. यावेळी व्हिडिओ रेकॉर्डिंग, रील, सेल्फी असे फोटोसेशनही रंगले.

**महिलांचे डोळे पाणावले**

### रेव्ह पार्टी करणाऱ्यांना धोंड्याचे महत्त्व काय

**सभापती प्रा. शिंदे यांनी आयोजित केलेल्या धोंडे जेवण सोहळ्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी टीका केली होती. लेक-जावयांना रोजगाराची गरज आहे, धोंडे जेवणाची नाही असे भाष्य त्यांनी केले होते. त्यावर प्रतिउत्तर देताना सभापती प्रा. शिंदे म्हणाले, रेव्ह पार्टी करणाऱ्यांना धोंडे जेवणाचे महत्त्व काय समजणार अशा सूचक शब्दात त्यांनी खडसे यांच्यासह अन्य विरोधकांना टोला लगावला.**

यानिमित्त झालेल्या सन्मान सोहळ्यात बोलताना अनेक महिलांचे डोळे पाणावले. आम्ही अहिल्यादेवींच्या माहेर गावच्या लेकी असल्याचे सासरी अभिमानाने सांगतो, तो आमचा अभिमान आज लाडका भाऊ रामभाऊ यांच्यामुळे द्विगुणीत झाला. जुन्या मैत्रिणी भेटल्या, त्यांच्याशी गप्पा झाल्या, अधिक मासानिमित्त आईला भेटून तिची ओटी भरता आली आणि गावाने आमच्या ह्यांचा (पती) केलेला सन्मान आमचा आनंद वाढवून गेला, अशा भावना यावेळी महिलांनी व्यक्त केल्या. लताबाई गावडे-देवकर, उषा लोखंडे, शार्दुल निंबाळकर, सुरेखा उबाळे व अन्य महिलांना बोलताना गहिवरून आले. जावई मंडळीही भारावून गेले होते. त्यांच्यावतीने भावना व्यक्त करताना नाना करंजुले म्हणाले, चौंडीचा दाजी म्हणून आमच्या गावात आम्हाला कौतुक मिळतेच. मात्र आज चौंडीने केलेला सन्मान आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला.

**भावाचे कर्तव्य केले : प्रा. शिंदे**

यावेळी बोलताना सभापती प्रा. शिंदे यांनी गावच्या लेकींचा भाऊ असल्याच्या भावनेतून हा धोंडे सन्मान सोहळा केला असल्याचे सांगितले. गावच्या लेकींनी माहेर व सासरची नाती जपल्याचा आनंद आहे. दोन्ही कुटुंबे सांभाळताना चोंडीचा लौकिक वाढवला आहे. सभापती पदाच्या माध्यमातून सुमारे ५ हजार कोटीची अनेक विकास कामे करून चोंडीचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले त्यांचे जन्मगाव चौंडी हे जगाच्या नकाशावर आगळेवेगळे गाव करण्याचा प्रयत्न आहे. गावच्या लेक-जावयांनी कुटुंबीय व मित्रमंडळींसह नियमितपणे चोंडीला येऊन या गावच्या विकासात सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. या सोहळ्यास गावातील माजी सरपंच व मान्यवर मंडळी उपस्थित होते. अशोक देवकर, अभिमन्यू सोनवणे, पांडुरंग उबाळे, बाबासाहेब सोनवणे, भाऊसाहेब उदमले, शशिकांत देवकर, गुलाब शेख, रवींद्र जगदाळे, सतीश लहामटे, दत्ता शिंदे, शिवाजी देवकर आदींसह गावातील युवकांनी या सोहळ्यासाठी परिश्रम घेतले. जावयांना पसंतीनुसार पॅन्ट शर्ट, पायजमा, धोतर व लेकींनाही पाच वार, सहा वार, नऊवार व काठ पदरी साड्या त्यांच्या पसंतीनुसार भेट म्हणून दिल्या गेल्या. बत्तासे व अनारसे समवेत तांब्याचे दीपदानही अधिक मासानिमित्त दिले गेले. जिल्ह्यात पहिल्यांदाच आयोजित हा वेगळा सोहळा संस्मरणीय ठरला.

# जागतिक योग दिनानिमित्त निबंध स्पर्धा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्याधाम, कोहिनूर मॉल व श्रीपाद टॉईज यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य निबंध स्पर्धा आयोजित केली आहे अशी माहिती योग्य विद्या धामचे अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी दिली.

या स्पर्धेसाठी मिडीया पार्टनर आय लव्ह नगर आहे. ही स्पर्धा खुला गट व शालेय गट अशा दोन गटांमध्ये घेतली जाणार आहे. खुल्या गटासाठी आत्म्याशी मैत्री करण्याचा मार्ग अष्टांग योग, आधुनिक जीवनशैली आणि योग साधना ,योग केवळ शारीरिक व्यायाम की जीवन पद्धती व योग- संस्कृतीकडून समृद्धीकडे आणि विज्ञानातून अध्यात्माकडे या विषयावर घेण्यात येणार आहे . तर शालेय गटासाठी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली – योग, योगाभ्यासाचे आरोग्यासाठी महत्त्व व शालेय जीवनात योगाचे महत्त्व या विषयावर ही स्पर्धा होणार आहे

या स्पर्धेसाठी शब्द मर्यादा ४०० ते १००० शब्द ठेवलेली आहे. या स्पर्धेमध्ये मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये तुम्हाला निबंध लिहिता येतील . विजयी स्पर्धकांना प्रथम, द्वितीय,तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. तसेच नाव नोंदणी करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकांना ही बक्षीसे दिले जाणार आहेत.

स्पर्धकांनी आपले निबंध २० जून पर्यंत योग विद्या धाम कुष्ठधाम रोड, ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूलच्या मागे, साविडी येथे जमा करावयाचे आहेत. या स्पर्धे साठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे . नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ८२३७८२९१३७ किंवा ९३ २६ ९४ ० १ ३६ या नंबर वर संपर्क साधावा तसेच या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त लोकांनी व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान योग विद्या धाम चा पूजा गांधी यांनी केले आहे.

# एक चांगला माणूस घडला तर तो दुसऱ्यालाही घडवून समाजपरिवर्तन करतो – अनुपमा सिलास

## जागतिक अनाथ मिशनच्या आशिया खंड प्रमुखांची अहिल्यानगरच्या हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनला भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि निराधार घटकांसाठी कार्यरत असलेल्या हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनला जागतिक अनाथ मिशन (वर्ल्ड ऑर्फन्स मिशन) च्या आशिया खंड प्रमुख अनुपमा सिलास (अनु मॅडम) यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची पाहणी करून सुरु असलेल्या सामाजिक कार्य जाणून घेतले.

संस्थेच्या कार्याचा आढावा देताना फाउंडेशनच्या अध्यक्षा निर्मलाताई केदारी यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. त्या म्हणाल्या, ''फाउंडेशनमार्फत स्किल डेव्हलपमेंट, झोपडपट्टी भागातील जनजागृती, अन्नदान, शालेय साहित्य व गणवेश वाटप केले जाते. तसेच रेल्वे स्थानके व फ्लायओव्हर परिसरातील गरजूंना भोजन, आणि होप मिशन व होपस्टर उपक्रमांतून निराधारांना मदत व पुनर्वसनाचे कार्य सुरू आहे.''

यावेळी अनुपमा सिलास म्हणाल्या, ''सेवा करण्यासाठी पुढे येणाऱ्या व्यक्तींमुळेच अनेकांना जीवनाचा आधार मिळतो. एखाद्या दिवशी आपल्या हातून एखाद्या गरजू व्यक्तीला मदत झाली तर तो दिवस खऱ्या अर्थाने सार्थक ठरतो. एक चांगला माणूस घडला, तर तो दुसऱ्यालाही घडवतो आणि त्यातून समाज परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते.''



युद्ध किंवा इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी २०१४ पासून युक्रेनमध्ये कार्यरत असलेल्या जागतिक अनाथ मिशन चळवळीची माहिती देताना त्या म्हणाल्या, ''मुलांना शक्यतो त्यांच्या कुटुंबीयांशी व नातेवाईकांशी पुन्हा जोडणे, पालकांचे समुपदेशन करून त्यांना सुरक्षित आणि प्रेमळ वातावरण उपलब्ध करून देणे हे आमच्या चळवळीचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

लाईट हाऊस प्रोजेक्टची माहिती देतांना द हार्बर सोसायटी लाईट हाऊस'' प्रोजेक्टचे डायरेक्टर प्रमोद मगर यांनी सांगितले की, ''आमची सोसायटी समुदाय विकास, पुणे येथे रेड लाईट परिसरातील महिला व बालकांचे पुनर्वसन, कौटुंबिक समुपदेशन, दुर्लक्षित मुलांचे संगोपन, बेघर व निराधार व्यक्तींना मदत, महिलांसाठी शेल्टर होम, मनोरुग्ण व तणावग्रस्त व्यक्तींना आधार देणे अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. अहिल्यानगर येथील हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनचे कार्य सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे शिवाजी जाधव यांनी अनुपमा सिलास यांचा सत्कार केला. कार्यक्रमाला पीपल्स हेल्पलाइनचे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात, डेव्हिड औचिते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रंगीबेरंगी फुगे, आकर्षक रांगोळ्या, आनंददायी वाद्यसंगीत आणि शिक्षकांकडून औक्षण करून गुलाबपुष्प देत करण्यात आलेले स्वागत अशा उत्साहपूर्ण वातावरणात लालटाकी रोड येथील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. नवीन गणवेश, नवीन दप्तर, रंगीत डबा व वॉटरबॅगसह शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत होता.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत आयोजित या स्वागत समारंभात नवागत तसेच इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे सदस्य अर्जुनराव पोकळे, मनपाचे विषयतज्ञ शिंदे, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी, मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे आणि पत्रकार नवनाथ खराडे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून, गुलाबपुष्प व पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना अर्जुनराव पोकळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तकांचा जास्तीत जास्त लाभ घेऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे. उद्याचे सुजाण नागरिक बनण्यासाठी अभ्यासासोबतच जिज्ञासू वृत्ती जोपासणे आवश्यक आहे. दूरदर्शन व मोबाईलचा अतिरेकी वापर टाळून नवीन ज्ञान आत्मसात करण्यावर भर द्यावा. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात प्रश्न निर्माण होणे आणि त्यांची उत्तरे शोधण्याची वृत्ती विकसित होणे गरजेचे असून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणच भविष्यातील यशाचा भक्कम पाया घालते, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे यांनी सांगितले की, अशा स्वागत समारंभांमुळे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या मनातील शाळेविषयीचे दडपण कमी होण्यास मदत होते. शासनाच्या या उपक्रमामुळे शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होत असून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागण्यास हातभार लागतो. मुलांनी आनंदी वातावरणात हसत-खेळत शिक्षण घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी म्हणाल्या की, नवीन पुस्तके, नवीन दप्तर आणि नवीन शैक्षणिक वर्ष यामुळे मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा, शाळेची शिस्त पाळावी, शिक्षकांचा आदर करावा आणि आपल्या आई-वडिलांसह शाळेचे नाव उज्ज्वल करावे.

माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे यांनी शासनाच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा स्वागत कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आकर्षण निर्माण होते.

शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि संस्कार यांचा अंगीकार करावा. मोबाईलपासून दूर राहून गाणी, गोष्टी, खेळ आणि अभ्यास यांचा समतोल साधत सर्वांगीण विकास साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

# ज्ञानसंपदा शाळेत अमली पदार्थ सेवन विरोधी जनजागृती अभियान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ज्ञानसंपदा शाळेत नशा मुक्ती अभियानांतर्गत, अमली पदार्थ सेवन विरोधी टास्क फोर्स नाशिक यांच्या वतीने इयत्ता , नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करणे व अमली पदार्थ सेवनाच्या दुष्परिणामांची माहिती देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमात विश्वास बेरड, बाबासाहेब भवर, योगेश वाघ या तज्ज्ञ वक्त्यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्य तसेच इतर व्यसनाधीन पदार्थांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले. तसेच व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आवश्यक असलेली सकारात्मक जीवनमूल्ये, योग्य मित्रपरिवाराची निवड आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. शरीर मन आणि समाजावर आमली पदार्थाचे होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. मेंदूचा कार्यावर होणारा परिणाम निर्णय क्षमता, स्मृतिदोष, कुटुंबातील ताण तणाव, व्यसनामुळे शिक्षण ,करियर, आयुष्याची दिशा कशी बदलते याविषयी मार्गदर्शन केले. काही पोस्टर उदाहरणे आणि संवादातून या अमली पदार्थाच्या सेवनाचे दुष्परिणाम सांगितले गेले. तसेच मूल्य संस्कारावर भर देत आई वडील, शिक्षक यांचा आदर राखण्यासाठी आवाहन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेत, व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. शाळेच्या वतीने अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन निरोगी व सुदृढ पिढी घडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर तसेच, शिक्षकवृंद व अमली पदार्थ सेवन विरोधी टास्क फोर्सच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पालकांनी आपल्या नोकरी व्यवसाया बरोबरच पाल्याकडे लक्ष देणे गरजेचे – उपमहापौर धनंजय जाधव

## बोल्हेगाव येथील किड्स सेकंड स्कुलमध्ये पालक दिन साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विश्व् निर्मल फाउंडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री प्रायमरी सहज पब्लिक स्कुल मध्ये फादर डे हा दिवस साजरा करण्यात आला या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख अहिल्यानगर महानगरपालिके चे उपमहापौर धनंजय जाधव मा. नगरसेवक मदन आढाव संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा, कोषध्यक्ष संदीप गांगर्डे उपस्थित होते.

या वेळी पालकांना मार्गदर्शन करतांना धनंजय जाधव म्हणाले पालक हा कुटुंबाचा महत्वाचा घटक असतो, कुटुंबाचा कर्ता करविता असतो, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असतांना त्याचे आपल्या पाल्याकडे दुर्लक्ष होते.या करिता पालकांनी सुद्धा आपला पाल्य शाळेत जात असतांना काय शिक्षण घेतो, त्याला कोणत्या गोष्टीची आवड आहे व तो समाधानी आहे का अश्या बारीक सारीक गोष्टी पालकांनी पाहणे गरजेचे आहे. जर पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष दिले तरच त्याचे भविष्य उज्वल होण्यास मदत होऊ शकते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी शाळेची माहिती दिली व शाळा ही व्यवसायिकरण न करता आपण समाजाला काही तरी देणे लागतो ही भावना लक्षात ठेवून संस्था चालविली जात असून संस्थेने स्वमालकीची जागा घेतली असून लवकरच त्या ठिकाणी बांधकाम सुरु करणार असल्याची माहिती दिली. मा. नगरसेवक मदन आढाव यांनी सर्व पालकांना पालक दिना निमित्त शुभेच्छा दिल्यात. या वेळी शाळेच्या परिसरात पाहुण्याच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुरुवातीस प. पू. माताजी श्री निर्मलादेवी यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून सुरुवात करण्यात आली, या कार्यक्रमा मध्ये काही विदयार्थ्यांचे पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी पालक शिवाजी वायाळ साहेब,जितेंद्र निमसे, ऋषिकेश वायकर,सचिन खेडकर,चंदू कोकाटे, पुरुषोत्तम डेंगळे,पुंड दिपक पवार साहेब,सोनवणे साहेब, चव्हाण साहेब आदी उपस्थित होते. शाळेतील काही विदयार्थी मुले आराध्या गायकवाड,स्वरा पवार,सई पवार,वेदश्री राठोड,येवले अन्वी,शर्वरी लांडगे,अंश आढाव,ओवी चव्हाण रितिका कदम यांनी इंग्रजी मध्ये भाषणे दिलीत व नृत्य सादर केले.कार्यक्रमाचे स्वागत संस्थेचे कोषध्यक्ष संदीप गांगर्डे यांनी केले तर आभार रुपाली जोशी यांनी मानले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना भाटे यांनी केले. या वेळी शिक्षक संगीता गांगर्डे, अर्चना चव्हाण, अनिता गायकवाड, सीमा सोनावणे सोनाली कोरडे,राणी पवार ज्योती सुलक्षणे,किरण जाधव सर,ऋषिकेश क्षीरसागर,पवार नीलम,भालके मनीषा आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले. या वेळी पालक वर्ग मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# शहरातील वृक्षसंख्या वाढविण्यासाठी 'ग्रीन सिटी' मोहीम ठरणार प्रभावी – उद्योजक जनक अहुजा

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेच्या माहिती व जनजागृती पुस्तिकेचे प्रकाशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** वाढते तापमान, प्रदूषण, पाण्याची कमतरता आणि झपाट्याने कमी होत चाललेले हरित क्षेत्र ही आजच्या काळातील गंभीर आव्हाने बनली आहेत. भविष्यात हीच आव्हाने अधिक तीव्र स्वरूपात शहरांसमोर उभी राहणार असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मनपा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून, द्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेच्या माहिती व जनजागृती पुस्तिकेचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले.

या प्रकाशन सोहळ्यास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, उद्योजक जनक अहुजा, उद्योजक आदेश चेगेडिया, राजेंद्र बलदोटा, नगरसेवक निखिल वारे, अभिजीत बोरुडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्योजक जनक अहुजा म्हणाले की, आज मानवजातीसमोर वाढते तापमान, प्रदूषण, पाण्याची टंचाई आणि घटते हरित क्षेत्र ही गंभीर समस्या उभी ठाकली आहे. अहिल्यानगरसारख्या झपाट्याने विस्तारत असलेल्या शहरासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक आहे. शहराचा विस्तार होत असताना सिमेंटची जंगले वाढत आहेत; मात्र पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी 'अर्बन फॉरेस्ट' ही संकल्पना राबविण्याची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सुरू केलेली 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहीम ही अत्यंत कौतुकास्पद असून या माध्यमातून शहरातील वृक्षसंख्या वाढण्यास निश्चितच मदत होईल. वृक्षारोपण ही केवळ एक मोहीम नसून काळाची गरज आहे. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. निसर्गावर प्रेम करणे म्हणजे आपल्या भविष्यातील पिढ्यांचे संरक्षण करणे होय, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, अहिल्यानगरला हरित, स्वच्छ आणि आदर्श शहर बनविण्यासाठी प्रत्येक नगरकराचा सहभाग आवश्यक आहे. 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' या मोहिमेमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. प्रत्येकाने एक झाड लावले तर संपूर्ण शहर हिरवागार होण्यास वेळ लागणार नाही. स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर ही आपल्या सर्वांची सामूहिक संकल्पना असली पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, या मोहिमेच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन होईल. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी, शहराचे तापमान कमी करण्यासाठी आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या माहिती व जनजागृती पुस्तिकेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये वृक्षांविषयी जागरूकता निर्माण केली जाईल आणि पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ उभी राहील.

आदेश चेगेडिया म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी केली आहे.

# टाकळी ढोकेश्वर परिसरात विक्रम झावरे यांची जलसेवा; मोफत टँकरचे लोकार्पण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी न लावल्याने टाकळी ढोकेश्वर परिसरात पाणीटंचाईची चिंता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवक विक्रम झावरे यांनी परिसरातील नागरिकांसाठी मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा उपक्रम हाती घेतला असून या उपक्रमाचा शुभारंभ रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, तसेच दैनंदिन गरजांसाठी पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने ही मोफत टँकर सेवा सुरू करण्यात आली आहे. विक्रम झावरे हे सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिले असून गावातील विविध उपक्रमांमध्ये ते सातत्याने योगदान देत असतात. त्यांच्या या लोकहितकारी उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कार्यक्रमास परिसरातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये अशोकशेठ कटारिया, किसनराव धुमाळ, अंकुश पायमोडे, मळीभाऊ रांधवन, कृष्णा बांडे, प्रसाद खिलारी, दत्ता निवडुंगे, बबलू झावरे, मोहनराव रांधवन, भाऊसाहेब झावरे, भास्कर पायमोडे, नामदेव ठुबे, संपत आप्पा तराळ, नितीन खोडदे, राहुल बांडे, लहू जाधव, गणेश झावरे, देवा झावरे, महेश झावरे, संजय झावरे, अभिजित जाधव, पांडुरंग झावरे, बोरुडे गुरुजी, विशाल पायमोडे, संतोष खिलारी, बाळशीराम पायमोडे, मच्छिंद्र झावरे, विष्णू झावरे, श्रावण नाना गायकवाड, कुसकर सर, पांडुरंग गोरडे, बाबाशेठ गागरे, पांडुरंग बाडे, राजू नाना झावरे, आप्पा झावरे, संतोष बांडे, इंद्रभान गोरडे, संजय उदावंत, अशोक रांधवन सर, ठकाशेठ गागरे, ठका गोरडे, विठ्ठल पायमोडे, जाधव महाराज, भानुदास झावरे आणि सुरेश बांडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी विक्रम झावरे यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत समाजासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. पाणीटंचाईच्या संकटात नागरिकांना दिलासा देणारा हा उपक्रम निश्चितच आदर्शवत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पावसाची प्रतीक्षा सुरू असताना गरजूंसाठी मोफत पाणी उपलब्ध करून देण्याचा विक्रम झावरे यांचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

# राम घाडगे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

## वाढदिवसानिमित्त ७० रक्तदात्यांनी केले रक्तदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पक्षाचे नगर तालुका कार्याध्यक्ष रामभाऊ घाडगे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन वाढदिवसाचे औचित्य साधून रामभाऊ घाडगे यांच्या संकल्पनेतून रामभाऊ घाडगे मित्र मंडळ व अष्टविनायक ब्लड बँक यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी घाडगे यांच्या मित्र परिवारातील जवळपास ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच नवनागापूर येथे ठीक ठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले. तसेच चालू वर्षी दहावी व बारावी च्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या मुला-मुलींचे सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.रामभाऊ घाडगे हे आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपून अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करत आहेत हे पाहून अहिल्यानगर जिल्ह्याचे माजी खासदार डॉ. सुजय विखे, आमदार काशिनाथ दाते तसेच आमदार अक्षय कर्डिले यांनी नवनागापूर येथे येऊन राम घाडगे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.तसेच त्यांनी केलेले सामाजिक कार्याचे तोंड भरून कौतुकही केले. त्यानंतर राम घाडगे यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला त्यावेळी परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या सर्वांचे आभार मानत असताना घाडगे म्हणाले की मी स्वतः ला सामाजिक कार्यात वाहून घेतलेले आहे परंतु आज तुमचे सर्वांचे माझ्यावर असलेले एवढे प्रेम पाहून मी भावनिक झालो आहे यापुढील काळात तुमचा माझ्यावर असलेला विश्वास आणि माझ्या पाठीमागे तुमचे असलेले आशीर्वाद याच्या जोरावर मी अधिक जोमाने माझे समाजसेवेचे कार्य अविरतपणे सुरू ठेवणार आहे.



### रामा सारखे कार्यकर्ते असल्यामुळे नेत्यालाही काम करण्याचा उत्साह वाढतो

**राम घाडगे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत असताना तसेच त्यांनी राबविले सामाजिक उपक्रम पाहून अशा प्रकारे सामाजिक बांधिलकी जपून स्वखर्चातून समाज उपयोगी उपक्रम राबवणारा माझा कार्यकर्ता आहे याचा मला अभिमान आहे आणि असे निस्वार्थीपणे जनसेवा करणारे कार्यकर्ते जर पाठीशी असले तर माझ्यासारख्या नेत्यालाही काम करण्यासाठी अजून ऊर्जा मिळते.**

**डॉ. सुजय विखे**
**माजी खासदार अहिल्यानगर.**

### लोक हितासाठी पूर्ण ताकतीने तुमच्या पाठीमागे उभे राहू

**तुम्ही करत असलेली निस्वार्थी समाजसेवा, तसेच तळागाळातील सर्व सामान्य लोकांचे दैनंदिन प्रश्न अगदी पोट तिडकेने आपण सोडवण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत आहात हे आपले कार्य पाहून आम्ही भारावून गेलो आहोत यासाठी मी आज तुम्हाला एक शब्द देतो की या पुढील काळात तुम्ही करत असलेल्या निस्वार्थी समाजसेवेसाठी तसेच समाजातील गोरगरीब कष्टकरी लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तसेच प्रत्येक प्रकारच्या लोकहिताच्या कामासाठी आम्ही आमदार म्हणून तुमच्या पाठीशी पूर्ण ताकतीने उभे राहू.**

**आमदार काशिनाथ दाते**

# महावितरणची शेंडी शिवारात कारवाई

## वीज चोरी करणाऱ्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील शेंडी गावच्या शिवारात महावितरण कंपनीकडून वीज चोरीविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत सात वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेली वीज चोरी उघडकीस आणली असून, या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात सात जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**तपासणीत चोरी उघड...**

महावितरणच्या शेंडी कार्यालयातील कनिष्ठ अभियंता सुहास सखाराम शिंदे (वय ३५, रा. पाईपलाईन रस्ता, सावेडी) यांनी या संदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महावितरणच्या पथकाने २८ एप्रिल ते १३ जून दरम्यान शेंडी गावात केलेल्या तपासणीत संशयितांनी मुख्य वीज वाहिनीवरून अनधिकृतपणे वीज चोरी केल्याचे समोर आले.

यामध्ये पंदरीनाथ उत्तम कराळे, साहेबराव मधाजी दाणी, तुकाराम शंकर भगत, किरण राजेंद्र दाणी, नामदेव गजानन दाणी, भीमराज बाळासाहेब शिंदे आणि पोपट बाळासाहेब दाणी यांनी मोठ्या प्रमाणावर वीज चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. या सर्व संशयितांनी गेल्या काही महिन्यांत घरगुती आणि इतर वापरासाठी महावितरण कंपनीचे हजारो युनिटचे नुकसान केले होते.

त्यांना महावितरणकडून वीज चोरीचे देयक भरण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र त्यांनी ते भरले नाही. म्हणून कनिष्ठ अभियंता शिंदे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी विद्युत कायद्यानुसार सातही संशयितांविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत.

# राघव फाउंडेशनकडून होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी –** सामाजिक बांधिलकी जपत बेलवंडी येथील राघव फाउंडेशनच्या वतीने परिसरातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गणेश मैड यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शालेय किटमध्ये नामांकित कंपन्यांच्या शाळेच्या बॅगा, वह्या, कंपास, चित्रकला वही, पेन्सिल पॅक, पेन पॅक, कलर पेटी आदी साहित्याचा समावेश होता. जवळपास एक लाख रुपयांहून अधिक किमतीचे शालेय साहित्य विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले.



(छाया : केशव कातोरे)

याप्रसंगी परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, बेलवंडीचे लोकनियुक्त सरपंच ऋषिकेश शेलार, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक डॉ. रणजीत गुरव, डॉ. गणेश मैड, स्वाती मैड, उद्योजक चेतन शर्मा, राघव फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर जाधव, सचिव डॉ. अयोध्या मनोहर जाधव, संचालक सावता हिरवे, प्राचार्य राजेंद्र खेडकर, सुनील ढवळे, गणेश कांबळे, संदीप आरकस, असुरुद्दीन हावलदार, डॉ. विजय मैड, नानाभाऊ हिरवे, शरद इथापे, विठ्ठल लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते निखिल शेठ क्षीरसागर, मधुकर पवार, ह.भ.प. संभाजी महाराज दरोडे, प्रा. अंकुश बनकर, ॲड. हनुमंत गाजरे, निकिता शर्मा, अश्विनी जाधव, गणेश शेलार, कैलास राऊत, संतोष शेलार, निलेश पवार, कुमार गुरव, प्रकाश जाधव, दीपक धनवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राघव फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर जाधव यांनी केले. सूत्रसंचालन सचिव डॉ. अयोध्या मनोहर जाधव यांनी केले, तर आभार उद्योजक चेतन शर्मा यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश जाधव, यश जाधव, गणेश शेलार, निखिल क्षीरसागर, कुमार गुरव, अश्विनी जाधव आणि निकिता शर्मा यांनी विशेष परिश्रम घेतले.

(पान १ वरुन)

## एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांना दंड

आलेली आहे. रविवारी सायंकाळच्या सुमारास शहरातील दिल्ली गेट रस्त्यावर पोलीस प्रशासनाकडून नाकाबंदी करण्यात आली होती या नाकाबंदीमध्ये हाय सिक्युरिटी नंबर प्लेट नसलेली तसेच विनाक्रमांकाची, फॅन्सी नंबर प्लेट असलेली किंवा नंबर प्लेटच नसलेली अनेक वाहने पोलीस प्रशासनाकडून पकडण्यात आली अशा वाहनांना मोठ्या प्रमाणात दंड आकारण्यात आला आहे. हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी मध्यंतरी प्रशासनाने ३० जून पर्यंत मुदत वाढ दिली असल्याचे समजते. शहर आणि उपनगरातील वाहनधारकांनी आपल्या वाहनाला हाय सिक्युरिटी नंबर प्लेट नसेल तर ती तात्काळ बसवून घ्यावी असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दिल्लीगेट येथे रस्ता दुभाजकामुळे भीषण अपघात

सुमारास हा भीषण अपघात घडला. सध्याकाळच्या सुमारास रस्ता दुभाजक दिसून न आल्याने एक ट्रक थेट दुभाजकावर चढला. या अपघातामध्ये ट्रकचे पुढील दोन्ही चाके निखळून पडली तर दुभाजकाचा चा तुटलेला भाग रस्त्यावर आल्याने नेप्ती नाक्याकडे जाणारी एक स्विफ्ट डिझायर कार रस्ता दुभाजकाच्या तुटलेल्या भागावर धडकून त्याच ठिकाणी पुन्हा दुसरा अपघात झाला. या अपघातामध्ये कोणीही जखमी झाले नसले तरी दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अपघात होताच परिसरात मोठा आवाज झाल्याने नागरिकांनी अपघात स्थळी मोठी गर्दी केली होती. पोलीस प्रशासनास या अपघाताची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन वाहतूक सुरळीत करण्यास मदत केली. दिल्ली गेट वेस ते घोरपडे हॉस्पिटल दरम्यान काही महिन्यांपूर्वी रस्ता दुभाजक उभारण्यात आले होते. मात्र अत्यंत निकृष्ट दर्जाचे बांधकाम असलेल्या या रस्ता दुभाजकावर रात्रीच्या वेळी चमकणारे किंवा दिशादर्शक रेडियम अथवा रिफ्लेक्टर बांधकाम ठेकेदाराच्या माध्यमातून लावण्यात आलेले नाही. यामुळे रात्रीच्या वेळी वाहन चालकांना हे दुभाजक दिसून येत नसल्याने वारंवार या ठिकाणी अपघात होतच असतात. गेल्या तीन दिवसापूर्वी या दुभाजकांमधील अर्धा हिस्सा महानगरपालिकेच्या वतीने काढून टाकण्यात आलेला आहे. मात्र उर्वरित रस्ता दुभाजकावर रविवारी रात्री ट्रक धडकल्याने पुन्हा एक अपघात झाला.

## मोहरम मिरवणुकांमध्ये डीजेला बंदी

लक्ष ठेवण्याची मागणी केली. यावर पोलिसांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिले. नगर शहरातील मोहरम उत्सव देशभरात प्रसिद्ध मानला जातो. यंदा उत्सवाला १७ जूनपासून प्रारंभ होणार असून २६ जूनपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम आणि मिरवणुका पार पडणार आहेत. २१ जून रोजी मोहरमची पाचवी असून त्यादिवशी कोठला परिसरात सवारी स्थापना केली जाणार आहे. २५ जून रोजी रात्री मुख्य टेंभा मिरवणूक निघणार आहे. दुसऱ्या दिवशी २६ जून रोजी दिवसभर मिरवणुका सुरू राहणार असून रात्री सावेडी येथे सवारी विसर्जन केली जाणार आहे. यंदा एकूण २७ सवारी मोहरम उत्सवात सहभागी होणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. डॉ. टिपरसे यांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या मिरवणूक मार्गाचाच वापर करण्यात यावा. ऐनवेळी मार्ग बदलण्याचा प्रयत्न केल्यास किंवा पोलिसांनी उभारलेल्या बॅरिकेडिंगची मोडतोड केल्यास संबंधितांविरुद्ध थेट गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच उत्सव काळात सोशल मीडियावर विशेष वॉच ठेवण्यात येणार असून समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

## अहिल्यानगरात स्वागताचे आवाहन – बनसोडे

या सर्व हरकतींचा विचार करून संबंधितांचे म्हणणे शासनापर्यंत पोहोचविण्यात आले आहे. आंदोलनकर्ते आणि राज्य सरकार यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, बीड ते मुंबई लॉंग मार्च १५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता अहिल्यानगर शहरात दाखल होणार असून, चांदणी चौक येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात येणार आहे. तसेच मार्केट यार्ड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ सभेचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सुरेश बनसोडे यांनी केले आहे.

## गुरुजनांनी अनेक पिढ्या समृद्ध केल्या – ना. राधाकृष्ण विखे पाटील

शिक्षकांबरोबर इतरांचा फायदा होणार आहे. शिक्षक हा समाज परिवर्तन करतो, पेन्शनचा प्रश्नांचे श्रेय देखील शिक्षकांना मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्राप्त परिस्थितीत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पेन्शन दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकारीवर प्रशासकीय कारवाई करण्याचे सूचना त्यांनी दिल्या.या प्रश्नाला न्याय दिल्याशिवाय राहणार नाही. आई-वडिलांप्रमाणे सर्वांना शिक्षक प्रिय असतो. त्यांनी घडविलेला विद्यार्थी मोठा झालेला असतो. हा प्रश्न सोडविण्याचे त्यांनी वचन दिले. तसेच विधानमंडळ भावनात सन्मानाने सहलीचे निमंत्रण देखील त्यांनी दिले. संघटनेचे अध्यक्ष द.मा. ठुबे गुरुजी म्हणाले की, जिल्हा परिषदेत पदाधिकारी नाही. त्यामुळे निवडश्रेणीचा प्रश्न सुटला नाही. लोक अदालत घेतली जाते, मात्र ज्येष्ठांचे प्रश्न प्रलंबित ठेवणे योग्य नाही. जिल्हा परिषदेत आढावा बैठक घ्या व पेन्शनरचे प्रश्न मार्गी लावण्याची त्यांनी सूचना केला. विधानसभेतून प्रश्न सोडवावा व राज्य पातळीवर हा प्रश्न सुटण्यासाठी हा मेळावा घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. रावसाहेब पवार गुरुजी यांनी अध्यक्षीय सूचना मांडली. उपाध्यक्ष कोल्हे यांनी स्वागत केले. लोणी येथील गुरुजींनी काय सांगू साहेब आम्हाला न्याय भेटेना... व आमच्या मागण्या मंजूर करा... या कविता सादर केल्या. कवी संजय गीते लिखित रानफुल काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. कळसकर गुरुजी यांनी देणगी दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले. सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी अशोक धसाळ, सुर्यभान काळे, बबन कुलट, शशिकांत इथापे, विनायक कोल्हे, गजानन ढवळे, महादेव गांगर्डे, ज्ञानेदेव थोरात, बापूसाहेब करपे, प्रतापराव आंब्रे, दत्तात्रय गावडे, विठ्ठलराव वाडगे, सु.फ. वांढेकर आदीसह सर्व तालुका अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते.